SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Special Cell- (0231) 2609148
Website - www.unishivaji.ac.in E-mail- spcell@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४, महाराष्ट्र
विशेष कक्ष
दूरध्वनी — ईपीएबीएक्स — २६०९०००, विशेष कक्ष — (०२३१)२६०९१४८
वेबसाईट— www.unishivaji.ac.in, ई—मेल — spcell@unishivaji.ac.in


Estd. 1962
"A++" Accredited
byC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र.विशेष कक्ष/२०२६—२७ /95/२०२६ दिनांक : 13 APR 2026

प्रति,

१. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/
मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय** : १. सन २०२६—२७ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण.
२. सन २०२६—२७ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणांस योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | समाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | SEBC | १० % |
| ९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| १० | खुला | OPEN | ३० % |
| | | एकूण | १०० % |

**टीप** : १) संस्था/महाविद्यालयातील प्रवेशासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षणाबाबत अंमलबजावणी, प्रवेश प्रक्रीयेच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करावयाची आहे. त्याचप्रमाणे त्या—त्या वेळी लागू होणारे शासन धोरणातील बदल लागू राहतील.

२) **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC)** याकरिता आरक्षण हे महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अनिधनियम क्र. १६) अन्वये लागू करण्यात आले आहे. यानुसार प्रवेशाकरिता लागू करण्यात आलेले निकष व टककेवारी वरील प्रमाणे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भात शासन धोरणात/निर्णयात सुधारणा लागू झाल्यास, त्याप्रमाणे सदर सुधारणा लागू राहतील.

❖ **विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे —

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवीस्तराबर शासन निर्णय क्र. जीईसी —१००० (१२३/२०००)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

**(सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)**

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/तांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्वस्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के आरक्षण देय आहे.

**(सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)**

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत : **(सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)**

**क)** महाराष्ट्र शासनाचे क्र. औचिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

**ख)** महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८/१८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

**ग)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

**घ)** महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/ मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

**ङ)** महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१९८४/१८५/८४३/ मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

**च)** महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि.२८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

**छ)** अराखीव उमेदवारांकरिता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि. ३१.०५.२०२१

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

❖ **प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१. संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील जागांवर प्रथमतः विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या गुणवत्तेनुसार (खुल्या किंवा मागास प्रवर्गांचा विचार न करता) खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा.

**(सोबत पृष्ठ क्र. १९)**

२. वरीलप्रमाणे कार्यवाही करत असताना मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांवर प्रवेश दिला गेल्यास, आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारीचे उल्लंघन होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तेव्हा गुणवत्तेनुसार प्रवेशाची कार्यवाही करण्यात यावी.

३. सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु.जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे.

**(सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)**

४. विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्तप्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

**(सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)**

५. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. ११/७/१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ते खालीलप्रमाणे :

**मुद्दा क्र. (३)** : गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

**मुद्दा क्र. (४)** : रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितांनी दि. ११/७/१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा.

६. विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल/पीएच.डी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या माहितीपुस्तिकेचे (Prospectus) सूक्ष्म अवलोकन करावे.

सदर एम.फिल/पीएच.डी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेऐवजी रिक्त राहिल्या तर वरील अ.क्र. ५ येथे नमूद केलेल्या दि. ११/७/१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार रिक्त जागा भरण्यात याव्यात.

७. दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९/६/२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी.दि. २९/६/२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे.

**(सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)**

९. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं.३१२३/२०२० या प्रकरणी दि.०५ मे २०२१ रोजी दिलेल्या "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या" (एसईबीसी) आरक्षणसंदर्भातील निर्णयास अनुसरुन, "आर्थिकदष्टया दुर्बल घटक" (ईडब्लूएस) आरक्षणसंदर्भात निर्गमित केलेल्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.३१/०५/२०२१ रोजीच्या शासननिर्णयातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**(सोबत पृष्ठ क्र.२७ ते ३४)**

१०. सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) याकरिता आरक्षण हे महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अनिधनियम क्र. १६) अन्वये लागू करण्यात आले आहे. तथापि यासंदर्भात शासन धोरणात/निर्णयात सुधारणा लागू झाल्यास त्याप्रमाणे सदर सुधारणा लागू राहतील.(सोबत जोडले आहे)

११. महाविद्यालय/संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या अनुषंगाने काही विशेष बाबी निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश समितीने, दंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात/संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

१२. स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी.२००३/प्र. क्र./३०१/मावक—२ दि. १/११/२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१३. शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा. न्यायालयाचे निर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या—त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१४. विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१५. महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ नियम इ. द्वारे बदल करण्यात आल्यास त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन सन २०२६—२७ मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये **सन २०२६—२७** करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. सीईटी-१०००/(१२१/२०००)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ एप्रिल, २०००

प्रस्तावना:-

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्त्व हा नागरिकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमांकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करुन सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे आस्थापूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमांकरिता ३०टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

शासन निर्णय:-

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गांसाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गांकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ जसे की, राज्य संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३०टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०९ जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३०टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

उच्च [illegible] सर्व प्रवर्गांतर्गत [illegible] महिलांसाठी [illegible] आरक्षण ठेवण्यात येईल. [illegible] पदवी अभ्यासक्रमांकरिता [illegible] येतात हवा प्रवेश अंतर्गत ठेवलेल्या ३० टक्के आरक्षण महिलांसाठी ठेवण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमधे पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. [illegible] १०९७/२५९३(१)/तांशि ५, दि.१९.९.१९९१ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३० टक्के करण्यात येत आहे..

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष भरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पशु विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २००८-२००९ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, सार्वजनिक संस्था समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरु व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकांमार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव (सर्वसाधारण उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागामार्फत)

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणाच्या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१८

संदर्भ : १) The Rights of Persons with Disabilities Act, २०१६.
२) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-७/मोफतशिक्षण/क-३१(२)/२०१७-१८/२८, दिनांक २०/६/२०१७.
३) संचालक तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २-अ/एडीएम/२०१८/४७४, दिनांक १०/४/२०१८.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने The rights of persons with Disabilities Act, २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

१) All Government institutions of higher education and other higher education institutions receiving aid from the Government shall reserve not less than five per cent seats for persons with benchmark disabilities.
२) The person with benchmark disabilities shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

केंद्र शासनाच्या या अधिनियमातील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती/विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :-**

The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या कलम ३२ (१) मधील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व

असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात यावी. यासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०६२५१८०५५६०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय.
५. कुलसचिव, सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठे.
६. सर्व संबंधित संस्था (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती/तांशि-४.

(10)

अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% टक्का समांतर आरक्षण देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अमुजा-२०११/ प्र.क्र. २१२/ का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - ०२ एप्रिल, २०१८.

वाचा- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ०६.०६.२०१६.

प्रस्तावना :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतींपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णयः-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे. त्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत-

१) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही. अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

२) तसेच ज्या मुलांचे आई वडिल हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात आपली शिफारस संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

३) उपरोक्त वाचा मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित/विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल मुलांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर निर्णय, शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणा-या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

५) शासन सेवेत प्रवेशासाठी अनाथ मुलांसाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण गट " अ" ते "ड"च्या सर्व पदावर लागू राहील.

६) सदर आरक्षणाची गणना पद भरती करण्यात येणा-या रिक्त पदावर करण्यात यावी.

७) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

८) त्याचप्रमाणे शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

९) अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

१०) अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) अनाथ आरक्षणाच्या लाभाच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्यास त्याबाबत अभिनिर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१३०९१३८०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandhya Sudhir Gawas

( सं.सु.गवस )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग
३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web www.dhe.org.in E-Mail info@dhe.org.in
[illegible]

जा.क्र. - मुसआप/२०१२/मा.सैनिक/आंव/विशि-८ ७०१५५ दिनांक [illegible]

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

विषय :- राज्यातील विद्यापीठात माजी सैनिकांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत.
संदर्भ :- प्र.शि.कानडे, कक्ष अधिकारी यांचे क्र. [illegible] दिनांक २५/८/२०१२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यातील विद्यापीठात सलग्न महाविद्यालयात माजी सैनिकांच्या मुलांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्याचे अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. तथापि सदर शासन आदेशाची अंमलबजावणी योग्यरीतीने होत नसल्याचे संदर्भित पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तरी सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थितीची माहिती शासनास सादर करावी व त्याची प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे १
यांचेकरिता

प्रत :- प्र.शि.कानडे, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२. यांना उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये माहितीस्तव सादर.

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
INWARD NO. 619
DATE :- 28 DEC 2012

(14)

(14)

महाराष्ट्र शासन (१२)

क्र. सैनिकु २०१२ / प्र.क्र. १८० / विशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १६ ऑगस्ट, २०१२

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय :- राज्यातील विद्यापीठात माजी सैनिकांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत.

महोदय,

राज्यातील विद्यापीठात तसेच महाविद्यालयात माजी सैनिकांच्या मुलांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत (प्रती सोबत जोडल्या आहे ) तथापि सदर शासन आदेशांची अंमलबजावणी निटपणे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव आपणास आग्रहाने विनंती करण्यात येते की, सदर आदेशांची विद्यापीठात तसेच संलग्नीत महाविद्यालयांमध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(प्र. मि. [illegible])
कक्ष अधिकारी

प्रत,

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना आवश्यकत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
INWARD NO. 37[illegible]
DATE :- 30 AUG 2012

शैक्षणिक आरक्षण - माजी सैनिक कल्याण
अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्निकल, टेक्नॉलॉजीकल,
पॉलीटेक्नीक, कला, वाणिज्य , अध्यापक महाविद्यालये

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. माजीसै- २००६/ (२४१ /०६) /मशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: १० सप्टेंबर, २००७

संदर्भ- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. टीसीएन-
१८८४/(१८५/८४)/मशि-४, दि. २८ जून, १९८४.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. आयटीआय-
१००२/प्र.क्र. ५१/व्यशि-२, दि. ३० एप्रिल, २००२
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. बीईसी-
२११२/(५०३३)(१)/मशि-६ दि. २८ एप्रिल, १९१२

परीपत्रक- सेवी /माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी, अभियांत्रिकी महाविद्यालय/ टेक्निकल / टेक्नॉलॉजीकल व पॉलीटेक्नीक शिक्षणासाठी प्रवेशासाठी ५ % जागा तसेच अध्यापक महाविद्यालयांच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी ५ % जागा तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून १% जागा किंवा जास्तीत जास्त १० जागा आरक्षित केलेल्या आहेत. असे असले तरी सदरहू नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे, राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना करण्याच्या संदर्भात नेमलेल्या तदर्थ समितीने, अहवालाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणलेले आहे. सदर अहवाल विधानपरीषदेस दि. २०.४.२००६ रोजी सादर करण्यात आला आहे.

२. सदर अहवालाच्या अनुषंगाने पुन्हा एकदा निदर्शनास आणण्यात येते की, राज्यातील आजी/ माजी सैनिकांच्या कल्याणार्थ शासन विविध योजना राबवित असते. त्याद्वारे माजी सैनिक/ युध्दविधवा/ माजी सैनिकांच्या विधवा/ माजी सैनिकांचे अवलंबित यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शासन कटिबध्द आहे. त्यामुळे आजी/ माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी शासनाने विहीत केल्यानुसार जागा राखीव ठेवण्यात येवून त्या फक्त संबंधित उमेदवारांमधूनच भरण्यात याव्यात. सदर जागा इतर प्रवर्गातून भरल्या जाऊ नयेत. जे संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत त्यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेवेळी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, माजी/आजी सैनिकांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रवेशाचा आढावा घेतील त्यावेळी त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

हे शासन परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 20070910114946001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सि. म. भोसले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(16)

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या ... शाळा ...
पुस्तिका 10 ... शासन ...

महाराष्ट्र राज्य
शिक्षण व सेवा योजना विभाग,
क्रमांक टी.जी.एम. 1204/167/85/ आर.टी.
मंत्रालय विस्तार, मुंबई-400032
दिनांक 13 जून, 1985.

प्रति,
[illegible]

शासन निर्णय

खाजगी अनुदान प्राप्त विद्यालयाच्या बाबतीत त्याच प्रमाणे शासकीय विद्यालयांत, महाविद्यालये, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमां प्रवेश देण्याबाबत शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग, क्रमांक टी.सी.एम. 271/ ... दिनांक 31 मे 1978 आणि टी.जी.एम. 04/185/85/ आर.टी. 20 जून 1984 नियमाने निश्चित करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे महाविद्यालयांमध्ये व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत ... प्रवेश देण्याकरिता शासनाने वेळोवेळी नियम निश्चित केले आ...

... महाविद्यालयांच्या ... शासनाने निश्चित केलेल्या ... आधारावर ... नियमांप्रमाणे निश्चित केले आहे.

3. महाराष्ट्र शासनाने ... आदी व मागास ... परवानगी आदि जाती, जमाती व इतर पूर्व मागास ... भटक्या ... इत्यादि विद्यार्थी ... ज्यांच्या मुलांना पुढील ... महाविद्यालयातील ... सर्व शाखांमध्ये 1985-86 ... शैक्षणिक वर्षापासून ... ठेवून ... आदी व मागास ... जाती, जमाती, इतर ... भटक्या जमाती ... ज्यांच्या मुलांना प्रवेश यावेत असा निर्णय घेतला आहे.

आदी व मागास ... आदि जाती, जमाती व इतर ... भटक्या, ... , ... , ... व [illegible]

...आदि जमातींचे ... या आदी व मागास ... ज्यांच्या मुलांसाठी प्रत्येक विभागात ...

रात्रीय कामकाजी [illegible] वाढ महाराष्ट्रात.

५. विद्यापीठे, महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे सर्व विभाग सुरू झाले आहेत व त्यामध्ये प्रवेश देणे आता विहित नियमावली प्रमाणे शक्य नाही. तरी येत्या एक वर्ष मात्र [illegible] प्रमाणे प्रत्येक विद्यापीठ, महाविद्यालय तसेच विद्यापीठाच्या प्रत्येक विभागामध्ये या बाबत विद्यार्थ्यांना रात्रीत प्रवेश मिळेल अशी खबरदारी संबंधित प्राचार्यांना, विभाग प्रमुखांनी घ्यावी. सदर रात्रीय वर्गास विद्यापीठाकडून मान्यता मिळावी म्हणून प्रत्येक विद्यापीठाकडे शासनातर्फे स्वतंत्र प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

या रात्रीय वर्गांसाठी, संबंधित महाविद्यालय अथवा विभाग यांना शासन अनुदान मंजूरी करता येणार नाही. त्यांच्या नियमित कार्यक्रमात या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील.

६. प्रत्येक जिल्हा शिक्षणाधिकारी/ अधिकाऱ्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांनी या बाबत योग्य ती कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाला त्वरित सादर करावा. विहित नियमावली मधील सुधारणा करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही – अस्पष्ट.
उपसचिव
महाराष्ट्र राज्य

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

उपरोक्त शासन परिपत्रक विभाग प्रमुख (विद्यापीठातील विविध अधिविभाग) तसेच प्राचार्य, [illegible] सर्व [illegible] महाविद्यालये/शिक्षण संस्था यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी [illegible]

तसेच ज्या महाविद्यालयांच्या संस्थेची [illegible] महाविद्यालयांनी [illegible] शासन परिपत्रक [illegible] निदर्शनास आणावे.

सही/-
उपकुलसचिव

जा.क्र. शिक्षक [illegible]/137

दि. 0?/10/2010

(18)

(18)

[illegible]

मा. [illegible]
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
([illegible])

विषय : [illegible]

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, [illegible]
२. [illegible]
३. महाराष्ट्र शासन [illegible]

२. [illegible]

३. [illegible]

४. [illegible]

५. [illegible]

[illegible]

प्रत : [illegible]

L:\DSW-\DSW-[illegible] - New\Current files\[illegible] (Edu Corr).doc

(19)

(19)

(१८)



उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून मागास प्रवर्गाकरिता राखीव जागा ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन शुद्धिपत्र क्रमांक : युएसजी- १४९३/(२४२८)/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, १९९६.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक - १२ जुलै, १९९४.
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धीपत्रक दिनांक १५ जून, १९९५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
४) शासन निर्णय, क्रमांक - युएसजी- १४९३/(२४२८)/विशि-४ दिनांक २२ जून, १९९५.

शासन शुद्धिपत्र :- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक युएसजी- १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत -

२. परिच्छेद - ४ : सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

तंत्रशिक्षण विभाग वगळता इतर शैक्षणिक विभागांतर्गत येणाऱ्या बिगर राखीव जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येऊ नये. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अराखीव म्हणून समजण्यासाठी पसंती कळविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात असे करताना शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२ टक्केपेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत नाही.

परिच्छेद-५ मधील "मात्र बदलाबदलीने इतर प्रवर्गातून/पासून ५२% पेक्षा अधिक असणार नाही" हे शेवटचे वाक्य पूर्णत: वगळण्यात यावे.

४. हे शुद्धीपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अ. मा. भट्टलवार
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव.

(20)

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांना लागू करण्यात आलेल्या प्रगत व उन्नत गटाचे तत्वाच्या (नॉन क्रीमिलेअर) अनुषंगाने जाती दाखले देण्याचे नमुन्यात बदल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १० /२००६/ प्र.क्र.१५/ मावक ५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

दिनांक : ३० जून, २००६

वाचा :- १) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४

२) शा.नि. स.क.,सां.का. व क्री. विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४ व दि. २२ जून, १९९४

३) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५

४) शा.नि. स.क., सां.का. व क्री.विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक ५ जून, १९९७

५) शा.नि. सा.न्या.,सां.का., क्री. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/ मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१

६) शा.नि. सा.न्या., सां.का. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१११/मावक-५, दिनांक २९ मे, २००३

७) शा.नि. सा.न्या., सां.का. व वि.स.विभाग क्र. सीबीसी १० /२००६/ प्र.क्र.१५/ मावक ५ दिनांक : ५ जून, २००६

**प्रस्तावना :-** सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयानुसार केवळ भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू केलेले आहे. आता महाराष्ट्र राज्य लोकसेवा - अनुसूचित जाती / जमाती व विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम - २००१ मधील कलम चार पोट कलम २(दोन) च्या परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून निरधिसूचीत जाती (अ) (विमुक्त जाती - अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गांना लागू करण्याची तरतूद केली आहे. सदर तरतूद विचारात घेऊन उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यासंबंधी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-** आरक्षण अधिनियम २००१ हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून निरधिसूचीत जाती (विमुक्त

- अ), भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यात येत आहे. 21

२. पदोन्नती वगळता ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आलेले आहेत, त्या त्या सर्व प्रयोजनाकरिता क्रिमीलेअरचे तत्व लागू राहील व त्याप्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. उन्नत व प्रगत गटाच्या (क्रिमीलेअरच्या) मार्गदर्शक तत्वासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने व विहित उत्पन्न मर्यादेसंदर्भात या विभागाने वेळोवेळी काढलेले आदेश विचारात घेण्यात यावेत.

४. संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १६ जून, १९९४ मधील मुद्दा क्रमांक ४ खाली, " हे आदेश भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम जाती, भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती आणि इतर मागासवर्ग यांना लागू राहतील" हा परिच्छेद वगळण्यात येत आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णय परिशिष्ट "क", "ड" व "इ" नमुने रद्द समजण्यात यावेत.

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सोडून विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "क" प्रमाणे राहील. तथापि, फक्त जाती प्रमाणपत्राची मागणी केल्यास त्या उमेदवारास परिशिष्ट "ड" प्रमाणे जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

६. या विभागाच्या समक्रमांकित दिनांक ५ जून, २००६ रोजी निर्गमित केलेले शासन परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

हे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांनी वरील सूचना तातडीने अमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २००६०७०१०१२२४५८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ISSUED
Date 30 JUN 2006

(बलदेव सिंह)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा / अपील शाखा, मुंबई (पत्राने)
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सर्व जिल्हा दंडाधिकारी.
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल)
सर्व उप जिल्हाधिकारी

त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त आदेश त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व तहसिलदारांच्या निदर्शनास आणावेत.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व कार्यासने, सा.न्या., सां.का. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती - मावक - ५.

(23)



संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ :
१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. जुलै, १९९४.
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सीबीसी/१४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. १५ जून, १९९५.
३) शासन निर्णय, क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. १५ जून, १९९५ व शुद्धिपत्रक दि. २१ मार्च, १९९६
४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि २२ जून, १९९५.
५) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. एडीटीएच/डब्ल्यूपी/एसएसजी दि. १०-७-१९९७.

प्रस्तावना :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/४१/९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या काही जातीच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. ८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातीसाठी एक स्वतंत्र विशेष मागास प्रवर्ग असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमीलीयरचे तत्त्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे. भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकांना समानता व समान संधी मिळावी म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पखाले विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरू असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के आरक्षणाची तरतूद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुद्ध केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भ १९९३ मा. सर्वोच्च न्यायालय ए. आर. पृ. क्र. ४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील

राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अवमान ठरू शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणाचे प्रमाण ५२ टक्क्यावरुन ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय :

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. सुधारणे १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थातील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे पुरव्यातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.
२. भारतीय संविधानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टीईएम १०२४/(६३०३) तांशि-१, दि. ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्याधारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.
३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.
४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.
३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असेल व दि. ९-७-१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि. २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.
   १. विशेष मागासवर्ग प्रवर्गातर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा जुळवून घ्याव्यात.
   २. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. शि. पिंपळे
शासनाचे सहसचिव

प्रति -
कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विशेष कक्ष विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग स्थायी समितीच्या उपसमिती बैठकीचा कार्यवृत्तांत

मा. अधिविभागप्रमुख, संख्याशास्त्र अधिविभाग यांच्या दि. २९/६/२०१८ रोजीच्या पत्रास अनुसरून व सर्व अधिविभागांच्या शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमधील समांतर आरक्षण विषयक कार्यवाही करणेसाठी विशेष कक्ष विद्यापीठ स्थायी समितीच्या उपसमितीची बैठक शुक्रवार दिनांक २९ जून २०१८ रोजी विद्यापीठ कार्यालयामध्ये दुपारी ४.३० वाजता आयोजित केली होती.

सदर बैठकीसाठी उपस्थितीचा अहवाल खालीलप्रमाणे —

१) डॉ. एस. डी. शिंदे, भूगोल अधिविभाग — अध्यक्ष
२) डॉ. ए. एम. सरवदे, इंग्रजी अधिविभाग — सदस्य
३) श्रीमती एन. डी. पाटील — सदस्या
४) श्री. ए. एस. नलवडे, उपकुलसचिव — सदस्य सचिव

— कामकाज —

बैठकीच्या सुरूवातीस उपकुलसचिव, विशेष कक्ष (सदस्य सचिव श्री. ए. एस. नलवडे) यांनी सर्व उपस्थित समिती सदस्यांचे स्वागत केले.

संख्याशास्त्र अधिविभागाने दि. २९/६/२०१८ रोजी सादर केलेले माजी सैनिक आरक्षणासंदर्भातील पत्र तसेच माजी सैनिक आरक्षणासाठीची शासनाची दि.१३.८.२०१४, दि. १३.६.१९८५ रोजीचे परिपत्रके इ. अनुलक्षून खालीलप्रमाणे ठराव केले. :—

१ संख्याशास्त्र अधिविभाग व पी.व्ही.पी.पी. महाविद्यालय, तासगाव येथील अपंग आरक्षणासंदर्भात विभागप्रमुख यांनी दि.२८.६.२०१८ रोजी विचारणा केली होती. त्यास अनुसरून विशेष कक्ष विभागाने आदेशान्वये संबंधित अधिविभागास अपंग प्रवर्गातील उपलब्ध विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता यादी तयार करावी व त्यातील गुणवत्ता अनुक्रमानुसार एका विद्यार्थ्यास त्याच्या प्रवर्गांतर्गत (खुला किंवा सामाजिक प्रवर्ग) प्रवेश देता येईल असे कळविलेले आहे. विभागाने केलेली ही कार्यवाही विद्यार्थी प्रवेशासाठीच्या समांतर आरक्षणविषयक प्रचलित शासन धोरणानुसार आहे.

....२

..२..

२. [illegible] अधिविभागप्रमुख यांनी दि. २९.३.२०१८ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेशातील माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत दि. १३.८.२०१४ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार अधिविभागांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

अ) प्रथम टप्पा : खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरताना गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल) या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही. आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे.

ब) दुसरा टप्पा : त्या नंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा अ मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

क) तिसरा टप्पा : वरील ब नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार अ येथे विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाने पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

आभार प्रदर्शनानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

| | |
|---|---|
| 29/6/18<br>श्री. ए. एस. नलवडे<br>सदस्य सचिव | 29/6/18<br>डॉ. एस. टी. शिंदे<br>अध्यक्ष |

27

अराखीव उमेदवारांकरीता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १० % जागा आरक्षित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ३१ मे, २०२१

वाचा:- १. शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ. दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २० मार्च, २०१९
३. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २६ एप्रिल, २०१९
४. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. ६ सप्टेंबर, २०१९
५. सा.प्र.वि., परिपत्रक क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २८जुलै, २०२०
६. शासन निर्णय क्र. राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दि.२३ डिसेंबर, २०२०

प्रस्तावना :-

संसदेने संविधानात १०३ व्या घटनादुरूस्तीनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण विहित केलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाने मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने संदर्भ क्र.१ अन्वये अराखीव उमेदवारांकरीता (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण लागू केले आहे. सदर आरक्षणाच्या लाभासाठी ज्या घटकांना राज्यात कोणत्याही मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ दिला जात नाही, अशा अराखीव उमेदवारांचा (खुला प्रवर्ग) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये राज्यात सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गास " महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे ) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) " मधील तरतूदींन्वये आरक्षण असल्याने राज्यात एसईबीसी प्रवर्गातील उमेदवार ईडब्ल्यूएस आरक्षणाच्या लाभासाठी अनुज्ञेय नाहीत. तथापि, ईडब्ल्यूएस आरक्षणाच्या लाभाबाबतचे केंद्र व राज्य शासनाचे निकष हे वेगवेगळे असल्याने केंद्र शासनाच्या सेवा व प्रवेश यामध्ये एसईबीसी उमेदवार हा केंद्र शासनाच्या निकषाच्या पूर्तता करुन ईडब्ल्यूएस

आरक्षणाचा लाभास पात्र असल्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच राज्य शासनाच्या सेवा व प्रवेशात एसईबीसी उमेदवारास ईडब्ल्यूएस लाभाबाबत संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या.

दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी (सी) नं.१५७३७/२०१९ मध्ये दि.०९.०९.२०२० रोजीच्या अंतरीम आदेशान्वये स्थगिती दिलेली असल्याने. सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय प्रलंबित असल्याची बाब लक्षात घेता, शैक्षणिक प्रवेश व पदभरती प्रक्रिया यामध्ये उद्भवलेल्या अडचणी विचारात घेवून तसेच विविध न्यायालयीन प्रकरणी झालेल्या निर्णयानुसार मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २३.१२.२०२० रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, संदर्भ क्र. ६ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना अराखीव पदांचा (खुला प्रवर्ग) अथवा ईडब्ल्यूएस आरक्षण हा लाभ ऐच्छिक ठेवण्यात आला आहे. तसेच ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवारांस एस.ई.बी.सी. प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय रहाणार नसल्याबाबत नमूद करण्यात आले होते.

आता, मा .सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं. ३१२३/२०२० [एसएलपी (सी) नं.१५७३७/२०१९] प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या अंतिम आदेशान्वये एस.ई.बी.सी . आरक्षण अवैध ठरविले असल्याने ,एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना मागासवर्ग आरक्षण लागू नाही .त्यामुळे एस.ई.बी.सी प्रवर्गातील उमेदवार हे अराखीव पदांच्या लाभासाठी अनुज्ञेय आहेत. सबब सदर उमेदवार जर दि.१२.२.२०१९ रोजीचा शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणाच्या लाभासाठीच्या पात्रतेबाबतच्या निकषांची पूर्तता करत असतील तर त्यांना आर्थिक दुर्बल घटक आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे. सदर बाब विचारात घेता दि. १२.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.त्यानुसार शासन आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे -:

## शासन निर्णय :

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं. ३१२३/२०२० या प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) आरक्षणासंदर्भातील निर्णयास अनुसरुन, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) दि.१२.२.२०१९ रोजीच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ (अ) (ब)

परिच्छेद २. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ खालील अटींच्या अधीन अनुज्ञेय राहील -:

(अ)राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी ज्या व्यक्तीच्या जातीचा समावेश महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती ,निरधिसूचित जमाती , (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम ,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ) यामध्ये समावेश नाही त्यांच्यासाठी शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, स्वायत्त विद्यापिठे यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १०% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्य घटनेच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक संस्थामध्ये लागू होणार नाही.

तसेच शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना मंडळे/ महामंडळे/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था ,प्राधिकरणे यांच्या आस्थापनेवरील सरळसेवेच्या पदांच्या कोणत्याही संवर्गातील नियुक्तीसाठी १०% ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव राहतील.

(ब) हे १०% आरक्षण राज्यात सध्या राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती, (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१) (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गासाठी आरक्षणाव्यतिरिक्त राहील.

२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या आरक्षणाच्या लाभासाठी पात्रतेबाबतचे निकष व कार्यपध्दती ही दिनांक १२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २(क) व २(ड) प्रमाणे कायम राहतील. परिच्छेद २ (क) (३) मध्ये नमूद प्रमाणपत्रासंदर्भातील परिशिष्ट- अ ही सदर शासन निर्णयासोबत जोडल्यानुसार राहतील.

३) दि.१२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद २(इ) मधील (४) वगळता अन्य तरतूदी या दि.१२.२.२०१९ मधील कायम राहतील. परिच्छेद (इ) (४) मधील तरतूद रद्द करण्यात येत आहे.

४) ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र हे मागील आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व मत्ता या आधारे देण्यात यावे. तसेच प्रमाणपत्राच्या ग्राहयता कालावधी हा त्या आर्थिक वर्षापर्यंत समजण्यात यावा. तसेच दि.१२.२.२०१९ ते ३१.३.२०१९या कालावधीत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांचा ग्राहयता

तसेच ज्या निवड प्रक्रियांमध्ये एक पेक्षा अधिक टप्पे समाविष्ट असतील अथवा निवड प्रक्रिया या पुढील आर्थिक वर्षामध्ये पूर्ण होणार असतील अशा प्रकरणी प्रमाणपत्राच्या ग्राह्यतेबाबतचा दिनांक जाहिरातीमध्ये स्पष्ट नमूद करणे आवश्यक राहील.

५) संदर्भ क्र.२ अन्वये सूचित केल्यानुसार, केंद्र शासनामधील नागरी सेवा व पदे यामध्ये सरळसेवा प्रवेशासाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी केंद्र शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या निकषांच्या आधारे केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

६) एसईबीसी प्रवर्गासाठी संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये देण्यात आलेले आदेश रद्द समजण्यात यावे.

७) एस.ई.बी.सी. उमेदवारांना संदर्भ क्र.६ अन्वये देण्यात आलेले लाभ कायम ठेवण्यात येत असून एस.ई.बी.सी. उमेदवार ईडब्ल्यूएस लाभासाठी पात्र असल्यास त्यांना विहीत प्रमाणपत्राच्या आधारे ईडब्लूएस आरक्षणाचा लाभ घेता येईल.

८) संदर्भ क्र.६ अन्वये एसईबीसी उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा देण्यात आलेला लाभ खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील:-

(i) सदर लाभ एस.ई.बी.सी. आरक्षणाच्या अंतरीम स्थगितीपासून म्हणजे दि.९.९.२०२० पासून दि.५.५.२०२१ या कालावधीसाठी लागू राहील.

(ii) दि.९.९.२०२० पूर्वी ज्या निवड प्रक्रियांचा अंतिम निकाल लागलेला आहे परंतु उमेदवारांच्या नियुक्त्या प्रलंबित आहेत अशा प्रकरणी सदर आदेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

(iii) ज्या निवड प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत व एस.ई.बी.सी. आरक्षणानुसार नियुक्त्या करण्यात आल्या आहेत अशा प्रकरणांमध्ये सदर आदेश अनुज्ञेय होणार नाहीत.

(iv) ज्या निवड प्रक्रिया या दि.९.९.२०२० पूर्वी पूर्ण होवून नियुक्ती आदेशानुसार उमेदवार हजर झाले होते व एस.ई.बी.सी. उमेदवारांचे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र अवैध ठरविले होते, अशा प्रकरणी सदर आदेश लागू नाहीत.

९) सदर आदेश यापुढील सर्व शैक्षणिक प्रवेशांसाठी लागू राहतील.

१०) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक पात्रता प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत नियुक्ती प्राधिकारी/ शंका उद्भवल्यास सदर प्रमाणपत्राची परिच्छेद २ (ड) मधील २ (i), (ii), (iii) नुसार अपील सादर करुन त्यानुसार पडताळणी करण्यात यावी.

११) संबंधित भरती वर्षात सदर आरक्षणांतर्गत सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा

१२) हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालय, महाविद्यालय, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील. संबंधित यंत्रणांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०५३११२५०५९९४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIKARAM WAMAN KARPATE

( टि.वा.करपते )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व विभागीय जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

१८. उप सचिव (आस्थापना शाखा) , सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
२०.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२१.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०.निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दि. ३१.०५.२०२१ सोबतचे

सहपत्र

परिशिष्ट अ

महाराष्ट्र शासन

प्रमाणपत्र क्र.

फोटो

वर्ष ----------- करीता ग्राहय

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र .राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ. दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये

(आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या १० आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी )

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------- श्री/श्रीमती------------ ---------------यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर-------------तालुका -------------- जिल्हा/विभाग --------------- महाराष्ट्र चे रहिवासी आहेत .तो/ती ------------- जातीचे असून जात /पोटजात /वर्ग चे असून सदर जात महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती ,निरधिसूचित जमाती, (वि.जा.) भटक्या जमाती (भ.ज.) ,विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र.) आणि इतर मागासवर्ग (इ.मा.व.) यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) यामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गातर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२.०२.२०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटूंबाचे सर्व स्रोतांचे वर्ष --------------मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. अनून, सदर उत्पन्न रु.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक:

स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१

२

३

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ. दि. ३१.०५.२०२१
सोबतचे सहपत्र

Annexure-A

**Government of Maharashtra**

Certificate No :

Photo

**(valid for Year            )**
**Eligibility certificate for Economically Weaker Section**

(For the purpose of 10% reservation prescribed for Economically Weaker Section vide Government Resolution सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो 4019/प्र.क्र.31/16 अ dated 31.05.2021)

This is to certify that Shri/Smt/Kum ------------------------------------ is son /daughter/ward of ---------------------------------------------He/ She is resident of village / city -----------------Taluka --------------- District -------- and he /she belongs to --------------- caste/sub caste /class which is not included in the cadres mentioned in the Maharashtra State Public services (Schedule Caste, Schedule Tribes, De-notified Tribes (Vimukta Jati), Nomadic Tribes, Special Backward category and Other Backward Classes) Act, 2001 ( Maharashtra Act No 8 of 2004).

As per norms prescribed Vide Government of Maharashtra, General Administration Department, and Government Resolution No. राआधो 4019/प्र.क्र.31/16 अ, dated 12.02.2019. His /Her gross family annual income for Year---------- from all source is Rs.---------------/- which is less than Rs.8,00,000/-. Therefore it is certified that he/ she is within category of Economically Weaker Sections.

Place :

Date :

Signature :

Name :

Designation:

(This certificate has been issued on the basis of following proof/evidences/documents)

1.
2.
3.

परिशिष्ट -७

35

RNI No. MAHBIL /2009/35530

SEBC
अधिनियम
26/02/2024
G.P. 27/02/2024

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ५]   सोमवार, फेब्रुवारी २६, २०२४/फाल्गुन ७, शके १९४५   [पृष्ठे ७, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.—महाराष्ट्र राज्याच्या संबंधात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून विवक्षित समाज विनिर्दिष्ट करण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यातील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या उन्नतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील नियुक्त्यांसाठी पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. पृष्ठे १-७

दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र राज्याच्या संबंधात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून विवक्षित समाज विनिर्दिष्ट करण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यातील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या उन्नतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील नियुक्त्यांसाठी पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून विवक्षित समाज विनिर्दिष्ट करण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यातील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या उन्नतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील नियुक्त्यांसाठी पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, **शासकीय राजपत्रात**, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " प्रवेश प्राधिकरण " याचा शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांच्या संबंधातील अर्थ, विशिष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देण्यासाठी जबाबदार असलेले, शैक्षणिक संस्थांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याचा अधिकार असणारे प्राधिकरण, असा आहे ;

(ख) " नियुक्ती प्राधिकरण " याचा लोकसेवा व पदे यांच्या संबंधातील अर्थ, अशा सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करण्यासाठी अधिकार प्रदान केलेले प्राधिकरण, असा आहे;

(ग) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ७ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे;

(घ) " शैक्षणिक संस्था " यामध्ये, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, संबंधित महाराष्ट्र अधिनियमांद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेल्या विद्यापीठांसह, ज्यांना शासनाचे सहायक अनुदान मिळते अशा, शासनाची मालकी व नियंत्रण असलेल्या, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्था, तसेच खाजगी शैक्षणिक संस्था,—मग त्या राज्याकडून अनुदानप्राप्त असोत किंवा अनुदानप्राप्त नसोत,—यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, " खाजगी शैक्षणिक संस्था " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या संस्थांना, एकतर, हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर, शासनाकडून सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही आर्थिक सवलतींच्या स्वरूपात सहाय्य देण्यात आलेले आहे, किंवा ज्यांना शासनाकडून, मान्यता दिली आहे, परवानगी दिली आहे, ज्यांचे पर्यवेक्षण केले जात आहे किंवा ज्यांच्यावर नियंत्रण ठेवले जात आहे, अशा संस्था, असा आहे ;

(ङ) " आस्थापना " याचा अर्थ, शासनाचे किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही अधिनियमान्वये घटित केलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा सांविधिक प्राधिकरणाचे कोणतेही कार्यालय, अथवा विद्यापीठ किंवा जिच्यातील भाग भांडवल शासनाने धारण केले आहे अशी कंपनी किंवा महामंडळ किंवा सहकारी संस्था अथवा कोणतीही शासकीय अनुदानप्राप्त संस्था, असा आहे.

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, " शासन अनुदानप्राप्त संस्था " या शब्दप्रयोगात, ज्या संस्थांना अथवा उद्योगांना, एकतर, हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी, अथवा त्यानंतर, शासनाकडून सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही आर्थिक सवलतीच्या स्वरूपात सहाय्य देण्यात आलेले आहे, अथवा ज्यांना शासनाकडून, मान्यता दिली आहे, परवानगी दिली आहे, ज्यांचे पर्यवेक्षण केले जात आहे किंवा ज्यांच्यावर नियंत्रण ठेवले जात आहे, अशा संस्थांचा किंवा उद्योगांचा देखील समावेश होतो;

(च) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(छ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ज) " लोकसेवा व पदे " याचा अर्थ, राज्याच्या कारभाराशी संबंधित असलेल्या सेवा व पदे, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) स्थानिक प्राधिकरण;

१९६१ चा महा. २४. (दोन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली आणि जिच्यात राज्य शासन भागधारक आहे अशी सहकारी संस्था;

२०१३ चा १८. (तीन) शासनाची मालकी व नियंत्रण असलेले, केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेले मंडळ किंवा महामंडळ किंवा सांविधिक संस्था, किंवा कंपनी अधिनियम, २०१३ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली शासकीय कंपनी;

(चार) महाराष्ट्र अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेल्या विद्यापीठासह, शासनाचे सहायक अनुदान घेणारी, शासनाची मालकी व नियंत्रण असलेली शैक्षणिक संस्था ; आणि

(पाच) ज्यांच्या बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, शासकीय आदेशांद्वारे आरक्षण लागू केले होते आणि ज्यांचा उप-खंड (एक) ते (चार) मध्ये समावेश केलेला नाही अशा, इतर कोणत्याही आस्थापना,

यांमधील सेवा व पदे यांचा समावेश होतो;

(झ) " आरक्षण " याचा अर्थ, राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आरक्षण आणि लोकसेवांमधील व पदांवरील नियुक्त्यांकरिता पदांचे आरक्षण, असा आहे;

(ञ) " सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२क नुसार महाराष्ट्र राज्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमान्वये विनिर्दिष्ट केलेले, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग, असा आहे;

(ट) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष २००४ चा महा. ८. मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ मध्ये अनुक्रमे, जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. मराठा समाजास, याद्वारे, राज्याच्या प्रयोजनांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येत आहे. राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग.

४. (१) हा अधिनियम, पुढील पदांखेरीज, राज्यातील लोकसेवांमध्ये व पदांवर केलेल्या सर्व सरळसेवा भरतीसाठी व नियुक्त्यांसाठी लागू असेल :— प्रयोज्यता.

(क) वैद्यकीय, तांत्रिक व शिक्षण क्षेत्रांतील अतिविशेषीकृत पदे;

(ख) बदलीद्वारे किंवा प्रतिनियुक्तीद्वारे भरावयाची पदे;

(ग) पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या तात्पुरत्या नियुक्त्या; आणि

(घ) कोणत्याही संवर्गातील किंवा श्रेणीतील एकल (एकाकी) पद.

(२) हा अधिनियम, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, इतर शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था,—मग त्या राज्याकडून अनुदानप्राप्त असोत किंवा अनुदानप्राप्त नसोत,- यांमधील प्रवेशास देखील लागू होईल.

(३) राज्य शासन, कलम २ च्या अनुक्रमे, खंड (घ) व (ङ) च्या स्पष्टीकरणात तरतूद केल्याप्रमाणे कोणतेही सहाय्य देण्यासाठी कोणत्याही शैक्षणिक संस्थेबरोबर किंवा कोणत्याही आस्थापनेबरोबर करार करताना किंवा कराराचे नूतनीकरण करताना, अशा शैक्षणिक संस्थेकडून किंवा आस्थापनेकडून या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी अट समाविष्ट करील.

(४) शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अधिनियम, २००६ या अन्वये इतर मागासवर्गांना दिलेल्या आरक्षणावर, परिणाम होणार नाही.

२००४ चा महा. ८.
२००६ चा महा. ३०.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील आणि पदांवरील नियुक्त्यांकरिता जागांचे आरक्षण.

५. (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा इतर प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून,—

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, इतर शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था,—मग त्या राज्याकडून अनुदानप्राप्त असोत किंवा अनुदानप्राप्त नसोत,—यांमधील प्रवेशाच्या एकूण जागांच्या दहा टक्के ; आणि

(ख) राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवा भरतीच्या एकूण नियुक्त्यांच्या दहा टक्के,

इतके आरक्षण, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात येईल :

परंतु, भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीअन्वये याबाबतीत राज्यपालांनी वेळोवेळी काढलेल्या अधिसूचनेनुसार, राज्याच्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये अनुसूचित जमातींच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदांना, वरील आरक्षण लागू असणार नाही.

(२) या अधिनियमाखालील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या आरक्षणाच्या प्रयोजनांसाठी, उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती, उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील व्यक्तींनाच केवळ या अधिनियमाखालील आरक्षण उपलब्ध असेल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, " उन्नत व प्रगत गट " याचा अर्थ, शासनाने, याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे, घोषित केलेल्या उन्नत व प्रगत गटात मोडणारी व्यक्ती, असा आहे.

आरक्षणाला बाधा न पोहचणे.

६. कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांचे किंवा व्यक्तींचे दावे हे, गुणवत्तेच्या आधारावर भरण्यात येतील अशा अनारक्षित जागांच्या वाटपाकरिता आणि लोकसेवांमधील नियुक्त्या व पदे यांकरिता देखील विचारात घेतले जातील, आणि अशा वर्गातील विद्यार्थ्यांची किंवा व्यक्तींची गुणवत्तेच्या आधारावर निवड केली असेल त्याबाबतीत, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता राखीव असलेल्या जागांच्या व नियुक्त्यांच्या संख्येस कोणत्याही प्रकारे बाधा पोहचणार नाही.

सक्षम प्राधिकारी.

७. (१) शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी व त्याखाली केलेले नियम अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी

जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) सक्षम प्राधिकारी, विहित करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील.

८. (१) जर कोणत्याही सेवाभरती वर्षाच्या बाबतीत, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या व्यक्तींसाठी राखीव असलेली कोणतीही जागा, भरलेली नसेल तर, अशी रिक्त जागा, सरळसेवा भरतीच्या बाबतीत पाच वर्षांपर्यंत पुढे नेण्यात येईल : राखीव असलेल्या रिक्त जागा पुढे नेणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, पदे भरण्याच्या संबंधातील कोणताही शासकीय आदेश, निर्णय, परिपत्रक व कार्यालयीन ज्ञापन अंमलात असेल तेव्हा, शासनाकडून त्यात फेरबदल केला नसेल किंवा ते रद्द केले नसतील तर, ते अंमलात असण्याचे चालू राहतील :

परंतु आणखी असे की, जर प्रत्येक राखीव प्रवर्गासाठी किमान एक पद वाटप करण्याकरिता मंजूर केलेली पदे, पुरेशी नसतील तर, याबाबतीत फेरबदल करण्यात येईल अशा, शासकीय बिंदू नामावलीच्या संबंधातील आदेशांनुसार किंवा विहित केलेल्या नियमांनुसार आळीपाळीचे तत्त्व लागू करून, राखीव पद भरण्यात येईल.

(२) जेव्हा पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एखादी रिक्त जागा पुढे नेण्यात आली असेल तेव्हा, ज्या सेवाभरती वर्षामध्ये ती पुढे नेण्यात आली असेल त्या सेवाभरती वर्षाकरिता व्यक्तींच्या संबंधित वर्गांसाठी राखीव असलेल्या रिक्त जागांच्या कोट्यामध्ये, ती हिशेबात धरली जाणार नाही :

परंतु, नियुक्ती प्राधिकरणास, अशा न भरलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी कोणत्याही वेळी विशेष सेवाभरती मोहीम हाती घेता येईल आणि जर अशा विशेष सेवाभरती मोहिमेनंतर देखील अशा रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर, त्यानंतर, शासन विहित करील अशा रीतीने त्या जागा भरण्यात येतील.

९. (१) शासनास, लेखी आदेशाद्वारे, प्रत्येक प्रवेश प्राधिकरणावर किंवा नियुक्ती प्राधिकरणावर किंवा अशा प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्यावर या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्याची जबाबदारी सोपविता येईल. अधिनियमाचे अनुपालन करण्याची जबाबदारी व अधिकार.

(२) शासनास, त्याच रीतीने, निर्दिष्ट केलेल्या प्रवेश प्राधिकरणाला किंवा नियुक्ती प्राधिकरणाला किंवा अधिकाऱ्याला, अशा प्राधिकरणाकडे किंवा अधिकाऱ्याकडे नेमून दिलेले असे कर्तव्य परिणामकारक रीतीने पार पाडण्यासाठी अशा प्राधिकरणास किंवा अधिकाऱ्यास आवश्यक असतील असे अधिकार किंवा प्राधिकार विनिहित करता येतील.

१०. (१) कर्तव्य किंवा जबाबदारी सोपविलेले, जे कोणतेही प्रवेश प्राधिकरण किंवा नियुक्ती प्राधिकरण किंवा अधिकारी किंवा कर्मचारी, या अधिनियमाच्या प्रयोजनांचे उल्लंघन होईल किंवा ते निष्फळ ठरतील अशा उद्देशाने हेतुपुरस्सर कृती करील, त्यास, अपराधसिद्धीनंतर, नव्वद दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील. शास्ती.

(२) शासनाच्या किंवा शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज, कोणतेही न्यायालय, या कलमाखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही.

११. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील कोणत्याही व्यक्तींवर, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा याबाबतीत काढलेल्या शासकीय आदेशांचे कोणत्याही प्रवेश प्राधिकरणाने किंवा नियुक्ती प्राधिकरणाने पालन न केल्यामुळे प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे शासनाच्या निदर्शनास आल्यास, किंवा निदर्शनास आणून दिल्यास, शासन, त्यास योग्य वाटतील अशा अभिलेखांची मागणी करू शकेल आणि तसे समुचित आदेश देऊ शकेल. अभिलेख मागवण्याचा अधिकार.

जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती.

१२. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून मराठा समाजाला जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ यांच्या तरतुदी, आवश्यक फेरफारांसह, लागू असतील. २००१ चा महा. २३.

निवड समितीमधील प्रतिनिधित्व.

१३. शासनास, आदेशाद्वारे, लोकसेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करण्याकरिता व्यक्तींची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ, निवड, चाळणी व विभागीय समिती यांमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील अधिकाऱ्यांच्या नामनिर्देशनाकरिता तरतूद करता येईल.

अनियमित प्रवेश व नियुक्त्या निरर्थक असणे.

१४. या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून दिलेले कोणतेही प्रवेश व केलेल्या नियुक्त्या निरर्थक होतील.

सक्षम प्राधिकारी लोकसेवक असणे.

१५. कलम ७ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

१६. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा काढलेल्या आदेशान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, सक्षम प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा त्याच्या अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

१७. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

व्यावृत्ती.

१८. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी ज्या प्रकरणी, आधीच निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली असेल, त्या प्रकरणांना, या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणार नाहीत, आणि अशा प्रकरणांच्या बाबतीत, अशा प्रारंभापूर्वी कायद्याच्या ज्या तरतुदी लागू होत्या आणि जे शासकीय आदेश लागू होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा संबंधित सेवा नियमांन्वये,—

(एक) केवळ लेखी चाचणीच्या किंवा मुलाखतीच्या आधारे, भरती करावयाची असेल आणि अशी लेखी चाचणी किंवा, यथास्थिति, मुलाखत सुरू झाली असेल; किंवा

(दोन) लेखी चाचणी व मुलाखत या दोन्हींच्या आधारे भरती करावयाची असेल आणि अशी लेखी चाचणी सुरू झाली असेल,

त्याबाबतीत, निवड प्रक्रिया सुरू झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये किंवा ज्या प्रकरणी, आधीच प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असेल अशा संस्थांमधील किंवा प्रकरणांमधील प्रवेशांना, या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणार नाहीत, आणि अशा प्रकरणांच्या बाबतीत, अशा प्रारंभापूर्वी, कायद्याच्या ज्या तरतुदी लागू होत्या आणि जे शासकीय आदेश लागू होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-१ चा
. २३.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा,—

(एक) कोणत्याही प्रवेश चाचणीच्या आधारे प्रवेश द्यावयाचा असेल, आणि अशी प्रवेश चाचणीची प्रक्रिया सुरू झाली असेल; किंवा

(दोन) प्रवेश चाचणीच्या आधारे असेल त्याव्यतिरिक्त प्रवेश द्यावयाचा असेल त्याबाबतीत, अर्ज भरण्याचा शेवटचा दिनांक समाप्त झाला असेल,

त्याबाबतीत, प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असल्याचे मानण्यात येईल.

० चा

१९. (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

२०१८ चा महा. ६२. २०. (१) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवकांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

१९०४ चा १. (२) महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम ७ च्या तरतुदी, असे निरसन अंमलात आणण्याच्या संबंधात, लागू असतील.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.